INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.625 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International Multidisciplinary E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

January - 2020 Special Issue - 220

## Current Scenario of Indian Economy



**Guest Editor:**
Dr. Y. T. Pawar
Principal,
MGV's Arts, Science and Commerce College,
Surgana, Dist. Nashik
(M.S.) India.

**Executive Editor of the issue:**
Dr. S. B. Ghuge
Miss. K. K. Bhoye

**Chief Editor:**
Dr. Dhanraj Dhangar

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY ONLINE RESEARCH JOURNAL

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' *International Multidisciplinary E- Research Journal*
Impact Factor - (SJIF) - 6.625,
Special Issue 220 : Current Scenario of Indian Economy
Peer Reviewed Journal

ISSN : 2348-7143
January-2020

## INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Economic Slowdown-Impact on Socio-Economic Environment | Dr. Advay Hiray Patil (Aba) | 05 |
| 2 | A Study of SIDBI Role in Developments of MSME | Prof. Prasad Kulkarni | 09 |
| 3 | Economic Recession in India : Causes, Effects and Recovery Measures | Dr. Narayan Gadhe | 16 |
| 4 | Recent Trends in Indian Economy | Prof. Sandeep Pawar | 21 |
| 5 | New Trends in Rural Development | Prof. Satyam Sanap | 25 |
| 6 | Impact of Modernisation on Agricultural Labour in the Agricultural Sector of India | Dr. Sadashiv Mengal | 28 |
| 7 | Challenges before Nationalized Banks | Dr. N. S. Sabale | 32 |
| 8 | SWOT Analysis and Economic Empowerment of Person | Dr. Vilas Epper & Vaishnavi Epper | 35 |
| 9 | Financial Inclusion in India - Recent Trends in Indian Economy | Dr. Asha Patil, Dr. Prashant Suryawanshi | 39 |
| 10 | Agro Tourism - The New Avenue of Progress for Rural India | Dr. Ashlesha Kulkarni | 46 |
| 11 | Role of Consumers in Buying Decisions with Special Ref. to Rural Market in India | Dr. B. L. Jadhav | 50 |
| 12 | Ease of Doing Business in India : Success and Failure | Dr. Sunil Ghuge | 58 |
| 13 | Rural Development Opportunities and Challenges | Dr. Ramesh Ingole | 63 |
| 14 | India and Rural Development Programme | Dr. Jayashree Kadam | 68 |
| 15 | Recent Trends of Economic Development in India & the Role of Women Entrepreneurs Management | Dr. Shivaji Thore | 73 |
| 16 | Profitability in Own Funds of District Central Co-operative Banks in Maharashtra | Dr. R. K. Binniwale | 77 |
| 17 | Analysis for Rural Development Grants 2018-19 | Dr. S. K. Pagar | 80 |
| 18 | Black Money and Corruption : One of the Problem of India | Dr. Dhiraj Zalte | 83 |
| 19 | Gandhian Concept of Rural Development | Prof. Devanand Mandavdhare | 86 |
| 20 | शेती उद्योगात नवीन सुधारणा : काळाची गरज | प्रा. अनिता फापाळे | 90 |
| 21 | कृषी व्यवसाय व्यवस्थापनातील सद्यस्थिती, नवीन सुधारणा आणि उत्पादकता वाढीच्या उपाययोजना | डॉ. जगन्नाथ साळवे | 95 |
| 22 | कृषी क्षेत्रातील गरज आणि नवीन सुधारणा | डॉ. विजय नागरे | 101 |
| 23 | सद्याच्या भारतीय अर्थव्यवस्थेतील कल | प्रा. विनायक खताळे, प्रा. सुधीर भोईर | 107 |
| 24 | भारतीय अर्थव्यवस्थेवरील मंदीचा परिणाम | डॉ. दिपक कारे | 110 |
| 25 | एक देश एक कर (जी.एस.टी.) | नाना चव्हाण | 114 |
| 26 | ग्रामीण विकासाच्या संधी आणि आव्हाने | प्रा. उमा देशमुख | 118 |
| 27 | जी.एस.टी. : भारतीय कर रचनेतील सुधारणा... | डॉ. शरद काकड | 121 |
| 28 | ठेव विमा व पत हमी महामंडळाची सद्यस्थिती | डॉ. बी. एम. सोनवणे | 124 |
| 29 | एकात्मिक बाल विकास सेवा योजना | श्रीमती अनुजा राव , डॉ. एस. के. पगार | 127 |
| 30 | शून्य खर्च नैसर्गिक शेती (झिरो बजेट फार्मिंग) : गरज व वास्तव | डॉ. दिनकर भदाणे | 132 |
| 31 | भारतीय अर्थव्यवस्थेतील नवीन बदल आणि आव्हाने | डॉ. सुरेश मगरे | 135 |

| | | | |
|---|---|---|---|
| 32 | उद्योग विकासात 'मेक इन इंडिया'ची भूमिका | डॉ. सुनील उगले | 143 |
| 33 | कृषी उत्पादन व आधुनिक सिंचन पद्धती | प्रा. एम. व्ही. हिरे | 153 |
| 34 | भारतातील शेती यांत्रिकीकरणाची प्रगती आणि भवितव्य | प्रा. कविता भोये | 156 |
| 35 | ठाणे जिल्ह्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या प्रगती आणि प्रभावाचा तुलनात्मक अभ्यास | श्रीमती अनुजा राव, डॉ. एस. के पगार | 161 |
| 36 | कृषी व ग्रामीण विकासात मानव संसाधन व सरकारची भूमिका | डॉ. संध्या सोनकांबळे | 165 |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी राखून ठेवलेले आहेत. प्रकाशकांच्या पूर्वपरवानगीशिवाय या अंकातील लेखांचे पुनर्प्रकाशन करता येणार नाही. या अंकात व्यक्त झालेली मते व विचार हे त्या लेखाच्या लेखकांचे वैयक्तिक विचार आहेत त्याच्याशी संपादक किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ मालकी हक्कासंदार्भतील संपूर्ण जबाबदारी लेखाच्या लेखकांची असेल.*

**- मुख्य संपादक, रिसर्च जर्नी**

**Published by –**

**© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik**
**Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258**

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.625,
Special Issue 220 : Current Scenario of Indian Economy
Peer Reviewed Journal
ISSN : 2348-7143
January-2020

# ठेव विमा व पत हमी महामंडळाची सद्यस्थिती

**डॉ. बी. एम. सोनवणे**
सहाय्यक प्राध्यापक अर्थशास्त्र
म.स.गा. महाविद्यालय मालेगांव कॅम्प, ता. मालेगांव (नाशिक)
मो. 9403164890

**प्रस्तावना –**

भारताची वित्तीय प्रणाली ही सक्षम वित्तीय प्रणाली म्हणुन सगळयांना परिचीत आहे. देशाची मध्यवर्ती बँक देशातील वित्तीय व्यवस्थेला सक्षमपणे परिचालीत करण्याचे महत्वपुर्ण काम करीत असते. भारतात स्वातंत्र्यानंतर वित्तीय व्यवस्थेचा पाया अधिक व्यापक स्वरूपात विस्तारीत करण्यात आला, कारण देशातील सुमारे 70 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात निवास करते. ग्रामीण जनतेचा रोजगार व चरितार्थ प्रामुख्याने शेतीक्षेत्रावर अवलंबुन आहे. शेती क्षेत्र हे निसर्गाचा जुगार असल्याची प्रतिची संपुर्ण देशातील जनतेला बघायळा मिळते. म्हणुनच 1975 पासून ग्रामीण भागात बँकांच्या शाखा विस्तारावर अधिक जोर देण्यात आला[1] ग्रमिण भागात बँकांचा शाखाविस्तार झाल्यामुळे ग्रामीण जनतेला बचतीची व गुंतवणूकीची सवय लागली. जुलै 1991 नंतर देशात उदारीकरणाचे व खाजगीकरणाचे वारे वेगाणे वाहु लागल्यामुळे ग्रामीण जनतेला बँकेशी अधिक व्यवहार करण्यासाठी चालणा मिळाली. भारताला स्वातंत्र मिळवुन 70 वर्ष पुर्ण झाले. या 70 वर्षात देशातील बँका पर्यायाने वित्तीय व्यवस्था बळकट करण्यासाठी वेळोवेळी परिणामकारक निर्णय घेण्यात आले. स्वतंत्र्यानंतर देशातील जनतेचा भारतातील वित्तीय व्यवस्थेवरील विश्वास दृढ झालेला असल्याचे निदर्शनास येते. देशातील सरकारी बँका, खाजगी बँका, सहकारी बँका व परकिय बँका या वित्तीय व्यावस्थेतील प्रमुख संस्था आहेत.

देशाच्या मध्यवर्ती बँकेचा "ट्रेण्ड्स ॅड प्रोग्रेस ऑफ बँकिंग" 2018-2019 च्या अहवालात देशातील सरकारी बँकामध्ये झालेल्या घोटाळयासंदर्भात माहिती देण्यात आलेली आहे.[2] 2017-2018 मध्ये सरकारी बँकेत 5916 घोटाळे उघडकीस आले, यात 41167 कोटी रूपयांचे बँक घोटाळे नोंदविले गेले. सन 2018-2019 मध्ये 6801 बँक घोटाळे उघडकीस आले आणि या घोटाळयांत एकूण 71543 कोटी रूपयांचे आर्थिक गैरव्यवहार झाले. ग्रामीण भागातील जनता सहकारी बँकामध्ये मोठ्या प्रमाणात व्यवहार करतात मात्र केंद्र शासनाने 8 नोव्हेंबर 2016 रोजी नोटा बंदिचा निर्णय जाहिर केला व चलनातील 500 व 1000 रूपये किंमतीच्या नोटा कायमस्वरूपी चलनातुन बाद केल्या.[3] तेव्हा पासुन ग्रामीण जनतेचा सहकारी बँकावरील विश्वास कमी झालेला आहे. 'महाराष्ट्र राज्य सहकारी बँक' तसेच 'पंजाब महाराष्ट्र सहकारी बँक' या बँकामध्येही कोट्यावधीचा आर्थिक गैरव्यवहार होऊन देशातील जनतेची पध्दतशिर आर्थिक लुट या वित्तीय संस्थांनी केलेली आहे. ग्राहकांच्या ठेवी वित्तीय संस्थामध्ये खरोखर सुरक्षित आहेत का? असा प्रश्न या ठिकाणी उपस्थित झाल्यावाचून राहत नाही. या प्रश्नाचे उत्तर शोधणारा हा लेख आहे.

**संशोधन लेखाची उद्दिष्टे –**

1) ग्राहकांच्या बँक ठेविना पूर्णपणे विमा संरक्षण मिळते का याची माहिती जाणुन घेणे.

ISSN : 2348-7143
January-2020

2) ग्राहकांच्या बँक ठेविना विमा संरक्षण देणाऱ्या ठेव विमा व पत हमी महामंडाळाची माहिती व कार्यपध्दती अभ्यासने.
3) ग्राहकांच्या वित्तीय व्यवस्थेवरील विश्वास टिकवुन ठेवण्यात ठेव विमा व पत हमी महामंडाळाची योग्यता अधोरेखीत करणे.

**संशोधन प्रणाली –**

प्रस्तुत लेखाच्या निर्मीती साठी माहिती संकलित करताना दुय्यम तथ्य संकलण पध्दतीचा उपयोग करून घेतला आहे. यात प्रामुख्याने मध्यवर्ती बँकेद्वारा प्रकाशीत अहवाल, वित्तीय संस्थांची संकेतस्थळे, वर्तमान पत्रातील प्रकाशित लेख आणि पूर्वप्रकाशित मासिकेतील लेखांचा आधार घेण्यात आला आहे. संकलित माहितीच्या स्पष्टीकरणासाठी 'विश्लेषन तंत्राचा' अवलंब केलेला आहे.

**विश्लेषण –**

ग्राहकांनी बँकेत ठेवलेल्या ठेवी सुरक्षित राहतील तेव्हाच ग्राहकांचा बँकावरील विश्वास टिकुन राहिल. ग्राहकांनी बँकेत ठेवलेल्या ठेवींना जर पुर्ण पणे विमा संरक्षण उपलब्ध असेल तर लोकांची बँकेतील गुंतवणूक अधिक सुरक्षित होईल. यामुळे बँकेत घडणाऱ्या आर्थिक गैरव्यवहारांचा ग्राहकांच्या विश्वासाहर्ततेवर फरक पडणार नाही. भारतात होणारे आर्थिक गैरव्यवहार बघता आता भारतामधील बँक प्रणाली अधिक सक्षम व बळकट करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी ग्राहकांच्या हितसंबधांचे संरक्षण करून बँक प्रणालीवरील ग्राहकांचा विश्वास सातत्याने वाढविण्यासाठी ठेव विम्याची आवश्यकता आहे.

**ठेव विम्याची संकलपना –**

भारतामध्ये 1949-1950 पासुन ठेव विम्याची संकलपण चर्चेत आली मात्र प्रारंभी ठेव विम्याची संकल्पना गांर्भीयाने विचारात घेतली गेली नाही परंतु 1960 मध्ये जेव्हा 'पलाई मध्यवर्ती बँक' व 'लक्ष्मी बँक लिमिटेड' या दोन बँका आर्थिक गैरव्यवहारामुळे बुडाल्या तेव्हा मध्यवर्ती बँक आणि केंद्र शासनाने गांभीर्याने विचार करून 1 जानेवारी 1962 रोजी 'डिपॉझिट इन्शुरन्स कायदा - 1961' आस्तित्वात आणला.(4) हा कायदा सुरूवातीला केवळ व्यापारी बँकांनाच लागु केला त्यानंतर 1968 मध्ये सहकारी बँकांना देखील हा कायदा लागु करण्यात आला.

शासनाने जुलै 1960 मध्ये बँकांनी कर्जपुरवठा करावा यासाठी उत्तेजन देण्याच्या उद्देशाने 'कर्ज हमी योजना' सुरू केलेली होती. 1978 मध्ये ठेव विमा कायदा व कर्ज हमी कायदा एकत्र करून 'ठेव विमा व पत हमी महामंडळ' (Deposit Insurance & Credit Guarantee Corporation) या नावाने वित्तीय कंपनी अस्तीत्वात आणली सध्या भारतात कार्यरत असलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील बँका, खाजगी बँका, भारतातील विदेशी बँका, सहकारी बँका, नागरी सहकारी बँका या सर्व बँकांकडुन ठेविदारांच्या एक लाख रूपयांपर्यंतच्या ( बचत ठेवी, मुदत ठेवी व आवर्ती ठेवी ) ठेवींना विमा सुरक्षा देण्यात येते. मात्र यात केंद्र सरकार, विदेशी सरकार, राज्य सरकार आणि इतर बँकांच्या ठेवी तसेच भारता बाहेरून मिळालेल्या ठेवींना विमा संरक्षण मिळत नाही.

1962 मध्ये भारतात ठेव विमा कायद्यांतर्गत ठेविदारांना त्यांच्या बँकेतील ठेवींवर एक हजार पाचशे रूपयांपर्यंत विमा संरक्षण देण्यात येत होते. मात्र 1993 पासून ठेव विमा व पत हमी महामंडळाद्वारे एक लाख

ISSN : 2348-7143
January-2020

रूपयांपर्यंत विमा सरंक्षण देण्यात आले. त्यावेळी देशातील सुमारे 90 टक्के जनतेच्या बँकेतील ठेवी या एक लाख रूपयांपेक्षा कमी होत्या म्हणजेच 90 टक्के लोकांच्या बँकेतील ठेवींना विमा सरंक्षण होते. जागतिकीकरणानंतर भारतातील लोकांच्या बँकेतील ठेवी या एक लाखापेक्षा जास्त वाढु लागल्या होत्या. देश्याच्या मध्यवर्ती बँकेने 2010 मध्ये नेमलेल्या दामोदरन समितीने लोकांच्या बँकेत पैसे ठेवण्याच्या वृत्तीला उत्तेजन देण्यासाठी बँकेत ठेवलेल्या पाच लाख रूपयांपर्यतच्या ठेवींना विमा सरंक्षण द्यावे अशी शिफारस शासनाला सुचविली. पण आजपर्यत या शिफारशीची अंमलबजावणी शासनाने केलेली नाही.

**विमा रकमेचे मुल्य निर्धारण –**

एका व्यक्तीला त्यांच्या बँक खात्यात ठेवलेल्या ठेवींवर रुपये एक लाख पर्यत विमा सरंक्षण मिळते. परंतु एका व्यक्तीने एकाच बँकेच्या वेगवेगळया शाखेत ठेवलेल्या एकूण ठेवी एकत्र करूण केवळ एक लाखाच्या रकमेलाच विमा सरंक्षण मिळते. मात्र जर एकाच व्यक्तीने वेगवेगळया बँकामध्ये ठेवी ठेवलेल्या असतील तर बँक बदललेली असल्यामुळे प्रत्येक वेगळया बँकेतील एक लाख रूपये पर्यतच्या ठेवींना विमा सरंक्षण घेता येते.

प्रारंभी ठेव विमा कायद्यांतर्गत विमा हप्ता प्रतिवर्ष 100 रूपयांसाठी पाच पैसे होता तो 2005 मध्ये ठेव विमा व पत हमी महामंडळाने 100 रूपयांसाठी दहा पैसे प्रतिवर्ष विमा हप्ता निश्चित केला. विमा हपत्याची संपूर्ण रक्कम बँक स्वताच्या रकमेमधुन जमा करते विमा रकमेचा भार बँकांच्या ग्राहकावर पडत नाही.

**निष्कर्ष –**

1) भारतात ठेवीदारांच्या एक लाख रूपयांपर्यतच्या बँकेतील ठेवींना विमा सरंक्षण आहे.
2) ग्राहकांच्या एक लाख रूपयांपर्यतच्या ठेवींचा विमा उतरवणे ही बँकाचीच जबाबदारी आहे.
3) विम्याची रक्कम वार्षिक 100 रूपयाला 10 पैसे म्हणजे एक लाखासाठी वार्षिक 10 रूपये ऐवढी बँकांना भरावी लागते.
4) एकाच बँकेच्या वेगवेळया शाखेतील एकूण जमा रकमेवर केवळ एक लाखापर्यत विमा सरंक्षण मिळते मात्र एकाच ग्राहकाला वेगवेगळया बँकेतील शाखेत जमा ठेवींवर एक लाखापर्यंत विमा सरंक्षण कायद्याने मिळते.
5) ठेव विमा व पत हमी महामंडळ शासन व मध्यवर्ती बँक यांच्या अधिपत्याखाली काम करते.
6) मध्यवर्ती बँकेच्या ( बँक अधिनियमन कायदा 1949 ) दुसऱ्या सुचित समाविष्ट असलेल्या म्हणजे परवानाधारक सर्व बँकांच्या ग्राहकांना विमा संरक्षण मिळते.

**संदर्भ –**

1. प्रा. एस.एम. कोलते, 'भारतीय बँकिंग प्रणाली', प्रशांत पब्लिकेशन जळगांव, 2014 पृष्ठ क्रमांक 268 ते 295.
2. https://rbidocs.rbi.org.in
3. https://investopedia.com
4. https://maharashtratimes.indiatimes.com
5. https://www.dicgc.org.in